संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# शेतकऱ्यांच्या वेदनांचे असेही भांडवल

**साहित्य** संमेलनाकडे अनेक विचारवंत, बुध्दीवंत किंवा ज्यांना खऱ्या अर्थाने मराठीचा स्वाभिमान आहे ते का पाठ फिरवतात त्याचे उत्तर साहित्य महामंडळाच्या कारभारातून आणि एकूण साहित्य संमेलनाच्या ढिसाळ आणि भोंगळ संयोजनातून आपोआप मिळते. यंदाच्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन एका आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबातील महिलेच्या हस्ते केले जाणे ही गोष्ट खूपच महत्वपूर्ण आहे. त्या समस्त आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मानवंदना करून आम्ही हे स्पष्ट करू इच्छितो की आज त्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची या साहित्यिकांना अचानक आठवण का झाली. कारण उद्घाटनाला कोणीच यायला तयार नाही. मग जिथे वाद होऊ शकणार नाही पण आपले राजकारण साधता येईल असे जे काही समाजातले घटक असतात. त्यांचा सोयिस्करपणे उपयोग करून घेतला जातो. त्याप्रमाणे इथेही शेतकऱ्यांच्या समस्यांचा वापर केला गेला. राजकारण किंवा राजकीय नेते यासंबंधात निर्ढावलेले असतातच. पण आता साहित्यिकांनीही आपले निर्ढावलेपण यातून सिध्द केले. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वेदनांवर फुंकर घालण्याऐवजी त्या जखमांचे स्वतःसाठी भांडवल म्हणून उपयोग करून घेण्याचा हा अत्यंत दुर्दैवी प्रयत्न म्हणावा लागेल. नयनतारा सहगल यांना बोलवण्यापूर्वी ज्या यवतमाळमध्ये शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या झालेल्या कुटुंबीयांपैकी एखाद्या महिलेला बोलवण्याची कल्पना का सूचली नाही. कारण त्यावेळेला त्याची गरज वाटत नव्हती. उद्घाटनाला साहित्यिक पाहिजे, त्यातही तो अधिक उच्चभ्रू असलेला चांगला असे स्टेटस सांभाळण्याचा उद्योग केला गेला. परंतु तिथेही दर्जाहीन नियोजन झाले आणि दिलेले निमंत्रण रद्द करण्याचा ऐतिहासिक प्रकार घडला. त्यानंतर तीन जणांकडे उद्घाटक म्हणून याचना केली गेली. परंतु साहित्य वर्तुळात वावरणाऱ्या सगळ्या मंडळींचा अहंकार जबरदस्त असतो आणि मग बदली कामगार म्हणून कोण जाईल, स्वतःचे महत्व टिकवून घेण्यासाठी किंवा कोणी मिळत नाही म्हणून निमंत्रण स्वीकारण्याची कोणीही तयारी दाखवली नाही. स्वाभाविकपणे संयोजकांपुढे पेच निर्माण झाला आणि मग ज्याप्रमाणे निवडणुकांसाठी, मतांसाठी शेतकऱ्यांची आठवण होते. कामगारांची आठवण होते. त्याच पध्दतीने या साहित्यकारणातही राजकारण खेळले गेले आणि अचानक यवतमाळमधल्या आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांची आठवण झाली.

### बेगडी संवेदनशीलता

खरे तर अशी आठवण झाली त्याबद्दल संयोजकांच्या संवेदनशिलतेची पूजाअर्चा करायला हवी. परंतु आता तीन दिवस तिथे ज्या काही भोजनावळी उठतील वेगवेगळ्या पदार्थांची रेलचेल होईल. त्या साहित्यिकांच्या मांडीला मांडी लावून किती आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना स्थान मिळणार आहे. किंवा त्या संमेलनात होणारी तीन ते चार कोटी रुपयांच्या उधळपट्टीतला किती पैसा हा या आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांच्या मुलांच्या शिक्षणासाठी वळवला जाणार आहे. या शेतकऱ्यांच्या संमेलनांना साद घालणारा एखादा तरी ठराव पारित करण्याचा संयोजकांचा विचार आहे का यापैकी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर संयोजकांकडे नाही. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांमधल्या एका महिलेला उद्घाटनाचा मान देत असताना आणि त्याविषयी अभिमान बाळगत असताना साहित्यिकांनीही सोयीचे राजकारण केले. हे मान्य केले पाहिजे. अतिशय स्पष्ट सांगायचे तर यात त्या महिलेला कोणताही मान मिळालेला नाही. तर तिच्यावर कोसळलेल्या संकटाचे संधीसाधूंनी राजकारण करून घेतले आहे. केवळ शेतकरी आहे, केवळ महिला आहे आणि आत्महत्याग्रस्त कुटुंबातली आहे म्हणून तिच्याविषयी दाखवलेली ही सहानुभूती मनापासूनची नाही. ती केवळ बेगडी स्वरुपाची आहे. त्यामागे शुध्द हेतू नाही. खरे तर महाराष्ट्रातल्या प्रत्येक संवेदनशील व्यक्तीने अशा प्रवृत्तींचा कठोरपणे समाचार घेतला पाहिजे. आणि यापुढे अशा जखमांनी विव्हळणाऱ्या वेदनांचे भांडवल करण्याचा प्रयत्न होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. स्वतःला साहित्यिक म्हणवून घेता तरीसुध्दा प्रामाणिकतेची चाड ठेवत नाहीत. साहित्यात याच प्रामाणिकतेला प्राधान्य असते. परंतु व्यवहारामध्ये इतक्या ढोंगीपणाने तुम्ही वावरत असाल तर त्याचा जेवढा निषेध करावा तेवढा थोडाच ठरतो. त्या आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलेला बोलवण्याची कल्पना अतिशय स्तुत्य ठरते. पण मग ती सुरुवातीला का नाही सुचली आणि सहगल यांच्याऐवजी त्या महिलेचाच का विचार झाला नाही. याची उत्तरे संयोजकांनी दिली पाहिजेत. 'दुरितांचे तिमिर जाओ' असे म्हणणाऱ्या माऊलींच्या महाराष्ट्रात मराठी साहित्याची फार मोठी परंपरा आहे. अमृताते पैजा जिंके हे तिचे विश्वव्यापी श्रेष्ठत्व आहे. कारण खळांची व्यंकटी सांडो आणि सत्कर्मी रति वाढो अशी उदार मागणीसुध्दा याच माऊलींनी केली. म्हणूनच साहित्य विश्वातल्या अशा संधीसाधू खळांचीही व्यंकटी सांडायला हवी त्यांना सुबुध्दी व्हायला हवी. असे यानिमित्ताने म्हणावेसे वाटते.

### उंची गमावल्याने खुजेपण

हा सगळा बुध्दीचा दिवाळखोरपणा पाहूनच आम्ही साहित्य संमेलनच रद्द करण्याचे सुचवले होते. कारण महाराष्ट्रात दुष्काळाचा विळखा शेतकऱ्यांवरचे कर्जाचे संकट या सगळ्या पार्श्वभूमीवर ज्या यवतमाळमध्ये शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या झाल्या तिथे साहित्याच्या नावाने जल्लोष करण्याचे काही कारण उरत नाही. कारण संमेलनामध्ये अशा प्रकारची जाणीव ठेवून साधेपणाने कोणीही वावरत नाही. पाहुण्यांचा थाटमाट आकर्षक मंडप , रांगोळ्या, दिंड्या, पताका असा सगळा सोहळा साजरा होत राहतो. पण आपण कोणत्या ठिकाणी साहित्य संमेलन साजरे करतो आहोत. तिथली सामाजिक, भौगोलिक परिस्थिती काय आहे याचा विचारही होत नाही. समाजातल्या अतिशय महत्वाच्या घटनांपासून संमेलन जर असे फटकून वागणार असेल तर ते संमेलन माणुसकीलाही पारखे झाले आहे की काय असे वाटू लागते. या सगळ्या पार्श्वभूमीवर यवतमाळमधला हा सगळा संमेलनाचा थाटमाट केवळ आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलेला उद्घाटनाला बोलवले म्हणून तो क्षम्य ठरणार नाही. जिथे मुख्यमंत्र्यांनीसुध्दा उद्घाटनाला येण्यापासून स्वतःला दूर ठेवले. त्यावरून साहित्य संमेलनाने एकूणच आपली उंची कमी करून घेतली आहे. अध्यक्षा कितीही विद्वत्तापूर्ण भाषण करणाऱ्या असल्या परंतु एकूण संयोजनातल्या त्रूटी आणि साहित्यिकांची मनोवृत्ती यावरून हे खुजेपण भरून निघणारे नाही.